REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# बौद्ध भिक्खुणी : एक समर्पित जीवन

श्रीमती कांबळे ए. ए.[1] , डॉ. श्री तुकाराम नारायण शिंदे[2]
[1]संशोधिका
[2]एम. ए. सेट, पीएचडी
इतिहास विभाग प्रमुख, ए. आर. महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

## प्रस्तावना :



काशाय वस्त्र परिधान केलेली, डोक्यावरील केसांचा त्याग केलेली, डोळ्यात अपार करूणा आणि चेहऱ्यावर मात्र बुद्धिमत्तेचे चमक असणारी, जिच्याकडे पाहताच आदराने नतमस्तक व्हावे अशी व्यक्ती म्हणजे बौद्ध भिक्खुणी होय. बौद्ध भिक्खुणी अर्थात थेरी होय.

"थेरी" हा पाली भाषेतील शब्द आहे. थेरी याचा अर्थ अनुभवी व ज्ञानी स्त्री.[1]

पी.एच.डी. चा अभ्यास करत असताना, विषयाच्या अनुषंगाने वाचन करताना या थेरींनी आणि त्यांच्या जीवनाने मनात कुतुहल आणि जिज्ञासा जागृत केली. आणि मग ठरविलेच की या "थेरी" बद्दल अधिक जाणून घ्यायचे, त्यांच्या जीवनाचा अभ्यास करायचा. हे करत असताना खालील उद्देश मी डोळ्यासमोर ठेवले.

## उद्देश

१. बौद्ध भिक्खुणी संबंधित ग्रंथाचे सखोल वाचन करणे. उदा. थेरीगाथा, विनयपिटक, महावंश, बुद्ध आणि त्यांचा धम्म वगैरे
२. गौतम बुद्धांनी स्त्रियांना सर्वसंग परित्याग करण्याची दिलेली परवानगी समजून घेणे.
३. भिक्खुणी होण्यामागील कारणांचा शोध घेणे.
४. भिक्खुणीसाठी असणाऱ्या वर्तन नियमाचा अभ्यास करणे.
५. काही भिक्खुणींच्या जीवनाचा परामर्श घेणे. उदा.पटाचारा, आम्रपाली, भद्दा कुंडल केसा, भद्दा कात्यायनी वगैरे.
६. थेरी संघमित्राचे श्रीलंकेतील कार्य जाणून घेणे.

## गृहितके

१. स्त्रियांनाही निब्बाण पदाचा अधिकार आहे.
२. बौद्ध भिक्खुणींना आठ गुरु धर्माचे पालन करणे आवश्यक आहे.
३. आचरणाच्या नियमांचे उल्लंघन झाले तर भिक्खुणी पदावरून काढले जाते.

४. विकून ह्या सर्व जाती-धर्माच्या वंशाच्या आहेत.
५. भिक्खुनींनी आपल्या पूर्व आयुष्यातील दुःखाचा त्याग करून त्या अर्हत पदावर पोहोचल्या आहेत.
६. समर्पितभावाने बौद्ध धर्माचा प्रसार व प्रचार करतात.

### विषयविवेचन

बोधिसत्व गौतमाला गया येथील पिंपळ वृक्षाखाली दिव्य ज्ञानाचा साक्षात्कार झाला. आणि ते "बुद्ध" झाले. तो पिंपळ वृक्ष बोधिवृक्ष झाला. बुद्धाने आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग जगाला दुःखमुक्ती करण्यासाठी वापरायचे ठरवले. आणि ते संपूर्ण भारतभर भ्रमण करू लागले. त्यांना प्रचंड संख्येने शिष्य येऊन मिळाले. इतर पंथाचे, वर्णाचे लोक देखील या मानवतावादी बुद्ध धम्मात आले. आणि आपले जीवन कृतार्थ करू लागले. यामध्ये आनंद, सारीपुत्त काश्यप बंधु ,महामोग्गलान, अंगुलीमाल, बिंबिसार, प्रसेनजित वगैरे प्रमुख होय.

### स्त्रियांना दीक्षा देण्याचा अधिकार

गौतम बुद्धाचे वडील महाराज शुद्धोधनाचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांची सावत्र आई व मावशी महाप्रजापती गौतमी ही तथागता कडे आली व तिने त्यांना घरदार सोडून प्रव्रज्या देण्याची विनंती केली. तथागताने नकार दिला. परत तिने विनंती केली. परत नकार. असे तीन वेळा झाले. मग ती थेर आनंदाकडे गेली व आपली व्यथा त्यांना सांगितली. आनंद तथागता कडे येऊन तिची मागणी सांगतात. तरीही नकारच येतो. तेव्हा आनंद म्हणतात की, स्त्रियां आर्हंत पद प्राप्त करू शकतात का? त्यावर तथागत "हो" म्हणतात. जर स्त्रिया अर्हत पद प्राप्त करू शकतात तर मग महाप्रजापती गौतमी तर तुमची मावशी आहे. तिने तुम्हाला दूध पाजले आहे. तुमचा सांभाळ केला आहे. मग तिला का परवानगी देत नाही? स्त्रियांनाही प्रव्रज्या मिळावी.तेव्हा तथागत परवानगी देत म्हणतात.

"आनंद यदि महाप्रजापती गौतमी आठ गुरु धर्म (बडी शर्ते) को स्वीकार करे तो उसकी उपसंपदा हो."[2]

अशाप्रकारे आठ गुरुधर्म जे बौद्ध भिक्षूंना द्यायच्या आदराबद्दलचे आठ नियम आहेत त्यांना आठ गुरु धर्म म्हणतात.ते तीला सांगण्यात आले. त्यानंतर तिला दीक्षा देण्यात आली आणि मग गौतमी बरोबर आलेल्या 500 शाक्य स्त्रिया देखील संघात सामील झाल्या.

अशाप्रकारे जगातील एक क्रांतिकारी अशी ही घटना घडली. की ज्यामध्ये अध्यात्माच्या क्षेत्रात स्त्रियांचे हे पहिलं पाऊल पडलेले दिसून येते. स्त्रीला देखील आपली उन्नती साधण्याचा, आपली आत्मिक उन्नती साधण्याचा मार्ग मिळालेला आहे. आणि जगातील कोणत्याही धर्मामध्ये स्त्रियांना मोक्षाचा किंवा निब्बाण पदाचा अधिकार कुठल्याच धर्म संस्थापकाने दिला नाही. परंतु तो अधिकार गौतम बुद्धाने मात्र आपल्या या बौद्ध धर्मात दिलेला दिसून येतो. यावरून हा धर्म किंवा हा धम्म मानवतावादी कसा आहे हे आपल्याला प्रकर्षाने आढळून येते.

### भिक्खुणी पातिमोक्ख

भिक्खुणी पातिमोक्ख म्हणजे भिक्खुणी साठीचे प्रतिबंधक नियम. या प्रतिबंधक बाबी जर कोणाकडून हेतूपुरस्सर किंवा नाईलाजास्तव घडल्या तर त्याची सर्वांसमोर चौकशी होऊन त्याला योग्य असा दंड दिला जात असे. त्या बाबी खालील प्रमाणे आहेत
१. **पाराजिक** : मैथुन, चोरी, मनुष्या हत्या, दिव्यशक्ती चा दावा, कामातुरता, कामातूर होऊन पुरुषांना स्पर्श करणे इत्यादी
२. **संघादिसेस** : पुरुषासोबत फिरणे ,चोरणीला भिक्खुणी बनवणे, ऐकटी फिरणे, कामासक्तीचे कार्य करणे,संघातून बाधित केलेल्यांना मैत्रीण करणे, पाराजिक प्रकारचे आरोप होणे, इतर भिक्खुणी यांची निंदा करणे, वाईट सांगत संघामध्ये फूट पाडणे कोणाचं काहींही न ऐकणे कुलांचा नाश करणे.
3. **निस्सग्गिय-पाचित्तिय** : पात्र चीवर वस्तू मागणे, अंथरून पांघरून मागणे, चांदी सोने रुपये पैसे यांचा व्यवहार, व्यापार करणे संघाला दिलेली वस्तू स्वतः घेणे वगैरे

४. **पाचित्तिय** : यात 72 प्रतिबंधक नियम आहेत वैयक्तिक खाणे पिणे स्वच्छता वगैरे बाबतीत हे नियम आहेत.

५. **पाटिदेसनिय** : खाण्याच्या वस्तू मागून खाणे. उदाहरणार्थ दही, तूप,तेल, मांस, मटन, दूध वगैरे. याबाबतीतले नियम यात येतात

६. **सेखिय** : शिकण्यासारख्या गोष्टी म्हणजे सेखिय. यात चिवर मापे, गृहस्थांच्या घरी कधी जाणे, भिक्षान्न कसं मागावे, उपदेश कसा करावा, शौच आणि मूत्रविसर्जन यासंबंधीची यात नियम आहेत.

७. **अधिकरण - समथ** : भांडणे मिटविण्याचे प्रकार.

अशाप्रकारे आयुष्यभर पाळावयाचे अगदी सूक्ष्म अतिसूक्ष्म नियम यात आहेत. ज्याची संख्या दोनशेच्या वर आहे. आणि हे नियम किंवा हे निर्बंध एखाद्या भिक्खुणी कडून ओलांडले गेले तर मात्र तिला शिक्षा ही होत असे. या अपराधाची चौकशी धर्मासनावर बसलेली भिक्खुणी दोन्ही बाजू ऐकून न्याय देत असे.अशाप्रकारे अत्यंत लोकशाही पद्धतीने या भिक्खुणी संघाचे प्रशासन चालते.

## सर्व जाती धर्माच्या वंशाच्या गणाच्या भिक्खुणी

भिक्खुणी संघाचा विचार केला तर यात सर्व जाती, धर्माच्या, वंशाच्या, गणाच्या भिक्खुणी आहेत. कोणी तरुण आहे,तर कोणी प्रौढा आहे तर कोणी वयस्कर आहे. काही अविवाहित आहेत तर काही विवाहित आहेत. म्हणजे सर्वच प्रकारच्या स्त्रियांना या संघामध्ये प्रवेश दिलेला आहे.

महाप्रजापती गौतमी, यशोधरा, तिस्सा पहिली व दुसरी मित्ता,सुमना, अभिरुप नंदा, सुंदरी नंदा, सीहा या राजकुळातील भिक्खुणी आहेत. तर सकुला, चन्दा, उत्तमा, दन्तिका ,मेत्तिका, मुक्ता या ब्राह्मण कुळातील आहेत. अड्ढकासी, विमला या वेश्या आहेत. तर अभय माता व आम्रपाली या नगरवधू अर्थात गणित आहेत. चापा ही पारधी जमातीची आहे. तर सुभा ही सोनाराची आहे. पुण्णिका ही दासी आहे. तर सुमंगल माता बुरुडाची आहे. यात काही प्रतिष्ठित व्यापाऱ्यांच्या मुलीही आहेत. उदा. धम्मदिन्ना, उत्तमा भद्दा कुंडलकेसा, वासेट्टी, सुजाता, इसिदासी वगैरे.

वरील उदाहरणे जर आपण पाहिली तर कुठल्याच जाती-धर्माचा विचार न करता गौतम बुद्धांनी प्रत्येक स्त्रीला या भिक्खुणी संघात प्रवेश दिलेला आहे. म्हणजे बुद्धाच्या धम्मात जातीभेद, धर्मभेद, वंशभेद नाही. तसेच वयाचाही भेद नव्हता केवळ लहान वयाची बालिका आणि गरोदर माता यांना मात्र प्रव्रज्या देत नाहीत.

## थेरीगाथा

बौद्ध भिक्खुणी यांचा विचार करत असताना "थेरीगाथा" या ग्रंथाचा विचार अनिवार्य ठरतो. कारण यात "थेरी" म्हणजेच बौद्ध भिक्खुणींचे भावविभोर असे उद्गार आहेत. जीवनातील दुःखाची आठवण व आताची परम शांती यांचा अत्यंत मनोज्ञ अविष्कार या थेरीगाथेत झालेला आपल्याला दिसून येतो. यातील काही गाथा आपण पाहूया.

## गाथाक्रमांक 31 व 32

"चतुर्दशी पौर्णिमा आणि दोन्ही पक्षातील अष्टमी तसेच पाटिहराय पक्षाच्या दिवशी मी आठ शिलाचे (व्रताचे ) पालन करीत असे. देवयोनीत जन्म व्हावा या इच्छेने उपोसथ ग्रहण करीत असे." //३१//[3]

"ती मी आज एक वेळ जेवण करणारी मुंडन केलेली व चीवर धारण करणारी आहे. अंतःकरणातील भीती नष्ट झाल्यामुळे देवयोनीची मी इच्छा करीत नाही."//३२//[4]

गाथा क्रमांक 31 आणि 32 या "मित्ता "या भिक्खुणीच्या आहेत. गाथा क्रमांक एकतीस मध्ये पूर्वीची तिची अवस्था आणि गाथा क्रमांक बत्तीस मध्ये जेव्हा ती भिक्खुणी झालेली आहे तेव्हाचे अत्यंत स्पष्ट आणि मनोज्ञ चित्रण आपल्याला या गाथेमध्ये स्पष्ट झालेले दिसून येते.

थेरीगाथा हे स्त्रीवादी साहित्य आहे. यात स्त्रियांच्या दुःखाचा, तिच्यावर झालेल्या अन्यायाचा, शोषणाचा आणि समाजाच्या दुटप्पीपणाचा एक आलेख मांडलेला आहे. एक पट उलघडलेला आहे. ज्यामुळे तीच दैनंदिन आयुष्य हे दुःखमय झालेले आहे आणि या दुःखातून परम शांती प्राप्त तिला बुद्ध धम्मात आल्यावर आणि प्रव्रज्या घेतल्यानंतर मिळालेली आहे. यातील काही भिक्खुणींचे जीवन चरित्र आपण पाहूया.

## पटाचारा

श्रावस्ती नगरीतील एका व्यापाऱ्याच्या पोटी पटाचाराचा जन्म झाला. वयात आल्यानंतर तिने आपल्या घरातील नोकरा बरोबर पळून जाऊन लग्न केले. आणि ते दोघेही एका दुसऱ्या गावात राहू लागले .कालांतराने ती गरोदर राहिली आणि त्यावेळेस तिला वाटू लागले की आपण बाळंतपणासाठी माहेरी जावे. म्हणून ती माहेरी निघते.परंतु तिचा नवरा मात्र तिला परत घेऊन येतो.

काही महिन्यानंतर  दुसऱ्या वेळेस ती गरोदर राहते. तेव्हा तिला वाटतं की आपण माहेरी जावावे आणि ती माहेरी जाण्यासाठी निघते. एक बाळ पोटात आणि एक हाताला धरून अशा अवघड अवस्थेत ती निघते.  थोडेलांब गेल्यानंतर पाऊस, वादळवारा प्रचंड चालू होतो. इकडे नवरा घरी येतो. पाहतो तर पटाचारा घरी नाही. तिला शोधण्यासाठी तोही निघतो. जंगलात सगळेजणच अडकतात.  नवऱ्याला साप चावतो. ती बाळंत होवून बेशुद्ध पडते. सकाळी नवऱ्याला पाहते. तिला प्रचंड दुःख होते. आता काय करावं म्हणून ती माहेरी जाण्यासाठी निघते. मध्येच महापुराने दुथडी भरून वाहणारी नदी लागते. तेव्हा आपल्या एका छोट्या बाळाला काठावर ठेवते आणि नुकतेच जन्मलेल्या बाळाला घेऊन ती नदीतून दुसऱ्या काठावर जात असते. तेव्हा एक घार येते आणि घिरट्या घालू लागते त्या छोट्या बाळाभोवती. ती घारीला हाकलण्यासाठी हातवारे करते तेव्हा काठावरील बाळाला ती आपल्याला बोलावत आहे म्हणून ते बाळ तिच्याकडे येवू लागते आणि पाय घसरुन पाण्यात पडते.आणि पाण्याबरोबर वाहून जाते. दुसरं जे नुकतेच जन्मलेले बाळ असते त्याला घार उचलून नेते. आपल्या डोळ्यापुढे पटाचाराच्या दोन्ही मुलांचा मृत्यू होतो. ती प्रचंड दुखी होते.तशीच पुढे चालत राहते. काही माणसं तिला रस्त्यात भेटतात. ती आपल्या आई-वडिलांविषयी विचारते तेव्हा एक व्यक्ती सांगते की बाई ग! रात्री फार मोठे वादळ आले. त्यातच तुझ्या घरावर वीज पडली आणि त्या मध्ये तुझ्या आई वडील भाऊ  सगळेच वारले. तेव्हा तशीच ती गावात येते आणि पाहते तर एकाच चितेवर सर्वांचेच प्रेतं जळत असतात.

आपल्या डोळ्यापुढे  नवरा दोन्ही मुलं आणि आई वडील भाऊ या सर्वांचा मृत्यू पाहून ती वेडीपिशी होते, तिला कशाचीच शुद्ध राहत नाही. ती दुःखाने भटकत राहते. एके दिवशी तथागत बुद्धांपाशी येते. तथागत तिची अवस्था पाहतात आणि तिच्या डोक्यावर हात ठेवतात. शांत होते. भानावर येते वेडीपिशी असणारी पटाचारा पुढे अर्हत पद धारण करणारी होते. जिच्या 30 शिष्या झालेल्या आहेत. तर अशी ही पटाचाराची कहाणी वैयक्तिक आयुष्यातील अत्यंत दुःखाचे जीवन भोगुन शेवटी परम शांतीला लागलेली ही पटाचारा.

## भद्दा कात्यायनी

म्हणजेच पूर्वाश्रमीची यशोधरा. तथागत भगवान गौतम बुद्धाची पत्नी. जिने दुःखाचा शोध घेण्यासाठी पती गेल्यानंतर पतीप्रमाणेच खडतर आयुष्य काढलेलं होते. जोपर्यंत गौतम बुद्ध बाहेर होते आणि त्यांनी जो सर्वसंग परित्याग केलेला होता, जे कष्ट भोगलेले होते. तसेच कष्ट तिने राजमहालात भोगले होते. ती कधीही गादीवर झोपले नाही, तीने आभूषणे, सुगंधी द्रव्य, उंची अन्न वस्त्र हे सर्व सोडून एखाद्या संन्याशी प्रमाणेच जीवन व्यतीत केलेलं होतं. आणि जेव्हा गौतम बुद्ध तथागत म्हणून तिच्यासमोर आले आणि तिला ज्ञानाचा प्रकाश दाखवला.तेव्हा तिने तिच्या मुलांसाठी, राहुलसाठी वारसा मागितला आणि वारसा मागितल्यानंतर तथागतांनी राहुलला बौद्ध भिक्षू बनवले. आणि स्वतः सोबत चल म्हणाले.

प्रजापती गौतमी सोबत यशोधराने देखील  बुद्ध संघामध्ये प्रवेश केला. तिनेही प्रव्रज्या घेतली. अशाप्रकारे सर्व सुखे पायाशी लोळत असताना देखील एक अत्यंत संयमी असे जीवन तिने  व्यतित केले होते. अशी ही भद्दा कात्यायनी.

## कुंडलकेसा

जिचे केस कुंडला प्रमाणे गोल गोल झालेले होते अशी ही कुंडलकेसा. पूर्वाश्रमीची राजगृहातील एका व्यापाऱ्याची मुलगी. तिचे मन एका चोरावर गेले आणि तिने हट्टाने त्या चोराशीच लग्न केले. पण चोराचा मूळ स्वभाव काय गेला नाही. त्याने तिला फसवलं आणि मग तिने देखील त्याला पर्वतावरून ढकलून देऊन आपल्याशी प्रतारणा केलेल्या व्यक्तीचा अंत केला. यानंतर तिने घरी न जाता ती जैन साध्वी बनली.तिने धर्माचा प्रचंड अभ्यास केला.तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. आणि त्यामध्ये ती इतकी प्रवीण झाली की गावोगावी ती वादविवाद करत फिरू लागली. मोठं नाव झालं तिचं.ती ज्या गावात जात असेल तिथे ती एक जांभळाची डहाळी मातीच्या ढिगाऱ्यावर रोवत असे. आणि जो कोणी तिच्याशी वादविवाद करायला तयार आहे. त्यांनी ती डहाळी त्याच्यातून उचलावी अशी तिची अट होती. खूप ठिकाणी ती फिरली.

एके दिवशी ती श्रावस्ती नगरीत आली. आणि नेहमीप्रमाणे तिने मातीच्या ढिगावर डहाळी पुरली.

त्यावेळी तथागत गौतम बुद्ध त्या नगरीत होते.

धम्मसेनानी सारीपुत्त नगरात प्रवेश करत असताना त्यांनी ती डहाळे पाहिली आणि त्यांनी ती उचलून घेतली. तिला ते समजलं आणि मग तिने येऊन वादविवादाला सुरुवात केली. सारीपुत्ताला तिने खूपसे प्रश्न विचारले सर्वांची त्यांनी उत्तरे दिली. शेवटी तिला एक प्रश्न विचारला की एक वस्तू काय आहे? या प्रश्नाचे उत्तर ती देऊ शकले नाही. शेवटी ती सारीपुत्ताच्या पायावर डोके ठेवून म्हणाले की मी तुम्हाला शरण आलेली आहे. ती तथागता कडे आली. उपदेश ऐकलाआणि ती बौद्ध धर्मामध्ये भिक्खुणी झाली. पुढे ती अर्हत पदाला देखील पोहोचली. अशाप्रकारे अत्यंत परखड बाण्याची,स्वतःचे स्त्रीत्व जपणारी,कुठल्याही परिस्थितीत न डगमगता स्वतःवर आलेल्या संकटाचा प्रतिकार करणारी आणि एक प्रखर ज्ञानी अशी ही कुंडलकेसा प्रकारे तथागत गौतम बुद्धाने प्रत्येक जीवालादुःखातून मुक्त केलेले आहे. आणि त्यांना परम शांतीचा मार्ग दाखवलेला आहे.

## किसा गौतमी

किसा गौतमीला देखील त्यांनी परम शांतीचा मार्ग दाखवला. "ज्या घरी एकही मृत्यू झाला नाही त्या घरातून थोडी मोहरी घेऊन ये तिने मी तुझा पुत्र जिवंत करीन".[5] अशी मोहरी मिळाली नाही. मृत्यूची अटळता ती समजून चुकली शेवटी एक "अर्हत" भिक्खुणी बनली.अशाप्रकारे जी स्त्री जीवनाच्या केवळ भौतिक वादात अडकलेली होती त्या स्त्रीला अध्यात्माच्या उंचीवर पोहोचवण्याचे कार्य गौतम बुद्धांनी केलेले आहे.

## भिक्खुणी संघमित्रा

बौद्ध धर्माची एक श्रेष्ठ आणि नावाजलेली प्रचारक म्हणून महाथेरी संघमित्रा यांना जग ओळखते.सम्राट अशोकांची ही कन्या. "महादेवी" या राणीपासून झालेली संघमित्रा आणि महेंद्र ही दोन अपत्य होय.

तिसऱ्या धम्म संगीती नंतर सम्राट अशोकाने ठीक ठिकाणी बुद्ध धर्माच्या प्रचारासाठी व्यक्ती पाठवल्या. त्यामध्ये महिंद्र हे श्रीलंकेला गेले. तिथे श्रीलंकेमध्ये अनुला देवी नावाची एक राजस्त्री 500 स्त्रियांसह प्रवर्जा घेणार होती. परंतु महेंद्र पुरुष असल्याने ते त्यांना दीक्षा देऊ शकत नव्हते. म्हणून राजा तिष्य याने महिंद्राच्या सांगण्यावरून सम्राट अशोकाकडे थेरी संघमित्रा आणि बोधी वृक्षाची डावी शाखा यांची मागणी केली. सम्राट अशोकाने विधीवत डावी शाखा आणि महाथेरी संघ मित्राला श्रीलंकेला पाठवून दिले. आणि तिने श्रीलंकेत येऊन पाचशे स्त्रियांना बुद्ध धर्माची दीक्षा दिली. धम्माच्या प्रसाराचे, प्रचाराचा कार्य अतिशय तळमळीने आणि सावधपणे केले. दोन विहार तिने भिक्षणीसाठी बांधावयास लावले. आणि शेवटी थेर महेंद्र आणि महाथेरी संघमित्रा या दोघांनी धम्मकार्यातच आपला देह श्रीलंकेतच ठेवला. महाथेरी संघमित्रा ५९ व्या वर्षी उत्तीय राजाच्या नवव्या वर्षात हत्थाळ हक्क विहारात परिनिर्वाण प्राप्त[6] झाली.

अशाप्रकारे बौद्ध धर्मामध्ये अनेक थेरींने आपले कार्य केलेले आहे. आज देखील जगातल्या बहुतेक देशांमध्ये या थेरी बुद्ध धर्माचा प्रसाराचे आणि प्रचाराचे कार्य अतिशय तळमळीने करत असलेल्या आपल्याला दिसून येईल.

## सारांश

वरील विषय विवेचनावरून हे सिद्ध होते की स्त्री ही कोणत्याही बाबतीत दुय्यम नाही. ती देखील आपला उद्धार करू शकते. अध्यात्माच्या सर्वोच्च पातळी विराजमान होऊ शकते. निब्बाण प्राप्त करू शकते. आणि हे करत असताना खडतर व कठोर असे नियम देखील पाळू शकते.

## संदर्भ

1 : विकिपीडिया

2 : महापंडित राहुल सांकृत्यायन ,विनयपिटक : चुल्लवग्ग  भिक्खुणी खन्दक क्रमांक   पृष्ठ.६२५

३ : अनुवादक : प्रा. डॉ. मेश्राम शेषराव, थेरीगाथा, गाथा क्रमांक 31 पृष्ठ क्रमांक 13

४ : अनुवादक :  प्रा. डॉ.  मिश्राम शेषराव, थेरीगाथा, गाथा क्रमांक 32 पृष्ठ क्रमांक 13

५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुद्ध आणि त्यांचा धम्म, संवाद प्रकाशन, पृष्ठ क्रमांक 424.

६ : अनुवादक : डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन, महावंश,पृष्ठ क्रमांक 126